# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.०२/०५/२०२४

## बाईक रॅलीद्वारे मतदान जनजागृती

आगामी लोकसभा निवडणूक 2024 करिता 22 पालघर मतदार संघात समाविष्ठअसलेल्या 132 (नालासोपारा) व 133 ( वसई ) मतदार संघात मतदारांनी मोठ्या प्रमाणात मतदान होण्यासाठी जनजागृती करिता SVEEP पथक तयार करण्यात आले आहे.

सदर SVEEP पथकामार्फत 132 (नालासोपारा) व 133 (वसई) मतदार संघात विविध ठिकाणी, शाळा, सिनेमागृह, सर्वशासकीय, निमशासकीय, महामंडळे, सहकारीसंस्था, बसस्थानके, शहरातील चौक व गर्दीची ठिकाणी मोठ्या प्रमाणात जनजागृती होण्याचे आदेश मा. जिल्हाधिकारी सो.पालघर यांनी दिलेलेआहेत.

उपरोक्त आदेशानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती A ते I या प्रभागात महाराष्ट्र दिन व कामगार दिना निमित्त दि.01/05/2024 रोजी सकाळी बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बाईक रॅली मध्ये नागरिकांनी मोठ्या प्रमाणात मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच "**आपले एक मत महत्वाचे आहे, एक मत देशाचे भविष्य ठरविणारे आहे, ते मत वाया घालवू नका, २० मे रोजी मतदान केंद्रावर नक्की या**", असा संदेश उपस्थित नागरीकांपर्यंत पोहचविण्यात आला.

सदर बाईक रॅली महानगरपालिकेच्या विविध प्रभाग समिती मध्ये राबविण्यात आली. सदर कार्यक्रमास मा.उपायुक्त तथा नोडल अधिकारी, विशाखा मोटघरे, प्रभाग समितीतील सहा.आयुक्त /प्र.सहा.आयुक्त, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मुख्य कार्यालय विरार
वसई विरार शहर महानगरपालिका